# पुणे महानगरपालिका

## भरतीप्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "आरोग्य अधिकारी" गट 'अ' या वैधानिक (statutory) एकाकी पदाच्या व विविध विषयातील तज्ञ डॉक्टरांच्या एकाकी जागांसाठी प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून www.punecorporation.org व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**<u>ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी वेळापत्रक</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरु होण्याचा दिनांक | २१/०८/२०१७ |
| २. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ११/०९/२०१७ (२३:५९) पर्यंत |
| ३. | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या शाखेमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | २१/०८/२०१७ ते १३/०९/२०१७ |

**सर्व पदांसाठी खालीलप्रमाणे आरक्षण राहील.**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एकूण मागासवर्गीय | अमागास | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |

**रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| अ)महिला(३०%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ब)खेळाडू(५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

| अ. क्र. | पदनाम, पदसंख्या | शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | **आरोग्य अधिकारी,**<br>**पदसंख्या (१)** | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय शास्त्रातील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्यशास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी [M.D(P.S.M.)] परीक्षा उत्तीर्ण<br>**ब)** राज्य शासन/ केंद्र शासन/ स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील सहाय्यक आरोग्य अधिकारी व तत्सम पदावरील किमान ७ वर्षाचा पर्यवेक्षकीय व कार्यकारी पदाचा अनुभव असणे आवश्यक.<br>**क)** रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषतः स्वच्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मुलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदी बाबींच्या कार्याचा |

| | | |
|---|---|---|
| | | किमान ०५ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य<br>**वेतनश्रेणी** : पे बॅन्ड ३७४०० - ६७००० + ग्रेड पे ८९०० + अधिक इतर भत्ते |
| २ | **त्वचारोग तज्ञ**<br><br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ**) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (त्वचा व गुप्तरोग शास्त्र) किंवा एम.बी.बी.एम. व डी.व्ही.डी. पदविका (Diploma in venral Diaseases) व डी.व्ही.डी. पदविका (Diploma in venral Diaseases) नंतरचा त्वचा व गुप्तरोग शास्त्र विषयातील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>**ब)** शासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील /खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य.<br>**वेतनश्रेणी** : पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |
| ३ | **एडस नोडल ऑफीसर**<br><br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ**) मान्यताप्राप्त विद्यापीठाची सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्यशास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी [M.D(P.S.M.)] परीक्षा उत्तीर्ण किंवा एम.बी.बी.एस. व मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदविका (डी.पी.एच.) व सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्यशास्त्र विषयातील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी.<br>**अनुभव** - शासकीय संस्थेतील एड्स संबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य<br>**वेतनश्रेणी** : पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |
| ४ | **मेडिकल ॲडमीनीस्ट्रेटीव्ह ऑफीसर**<br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.)<br>**ब)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची/ संस्थेची पदविका (डिप्लोमा इन हॉस्पिटल मॅनेजमेंट) किंवा (डिप्लोमा इन हॉस्पिटल ॲडमीनीस्ट्रेशन)<br>**अनुभव** - शासकीय/ निमशासकीय / खाजगी रुग्णालयातील सबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य<br>**वेतनश्रेणी** : पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |
| ५ | **न्यूरोसर्जन**<br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील एम.सी.एच. (Super Speciality Degree in Neurology) पदवी<br>**ब)** शासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील सबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य<br>**वेतनश्रेणी** : पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |
| ६ | **युरोसर्जन**<br><br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील एम.सी.एच. (युरोलॉजी) (Super Speciality Degree in Urology) पदवी<br>**ब)** शासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील सबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य<br>**वेतनश्रेणी** : पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |
| ७ | **कार्डीओलॉजीस्ट/ हृदयरोग तज्ञ**<br><br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची डी.एम.(**कार्डीओलॉजी**) किंवा समकक्ष पदवी.<br>**ब)** शासकीय /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील/ खाजगी रुग्णालयातील सबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य |

| | | |
|---|---|---|
| | | **वेतनश्रेणी :** पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |
| ८ | **प्लास्टिक सर्जन**<br><br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील एम.एस. व एम.सी.एच. (**प्लास्टिक सर्जरी**) (Super Speciality Degree in Plastic Surgery) किंवा समकक्ष पदवी.<br>**ब)** शासकीय /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील/ खाजगी रुग्णालयातील सबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य<br>**वेतनश्रेणी :** पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |
| ९ | **न्यायवैद्यक शास्त्र तज्ञ वैद्यकीय अधिकारी (न्यायवैद्यक शास्त्र)**<br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील एम.डी. (**न्यायवैद्यक शास्त्र**) किंवा एफ.एम.टी. किंवा डी.एफ.एम.टी. (Forensic Medicine and Toxicology) किंवा समकक्ष पदवी.<br>**ब)** शासकीय /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील/ खाजगी रुग्णालयातील सबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य<br>**वेतनश्रेणी :** पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |
| १० | **नेत्र शल्यचिकित्सक नेत्रतज्ञ**<br><br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ)**मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस. (**नेत्र चिकित्साशास्त्र**) किंवा एम.बी.बी.एस. व मान्यताप्राप्त विद्यापीठाची डी.ओ.एम.एस. (**नेत्र चिकित्साशास्त्र**) पदविका व डी.ओ.एम.एस. (**नेत्र चिकित्साशास्त्र**) नंतरचा नेत्र चिकित्साशास्त्र विषयातील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी<br>**ब)** शासकीय /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील/ खाजगी रुग्णालयातील सबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य.<br>**वेतनश्रेणी :** पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |
| ११ | **रक्त संक्रमण अधिकारी**<br><br>**पदसंख्या**<br>**(१)** | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम. डी. (शरीर विकृतीशास्त्र) किंवा एम.बी.बी.एस. व शरीर विकृती शास्त्रामधील पदविका व रक्त संक्रमण विषयातील एमसीआय मान्यताप्राप्त संस्थेतील Fellowship अथवा Blood Bank मधील किमान ०५ वर्षाचा अनुभव किंवा समकक्ष पदवी<br>**ब)** शासकीय /निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थेकडील/ खाजगी रुग्णालयातील सबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य<br>**वेतनश्रेणी :** पे बॅन्ड १५६०० -३९१०० + ग्रेड पे ६६०० + अधिक इतर भत्ते |

**टीप :-**

१) उपरोक्त नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव जाहिरात दिनांकास प्रमाणपत्रासहित पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

२) 'आरोग्य अधिकारी' या पदाच्या मुलाखतीचे वेळी उमेदवाराने सादर करावयाच्या अनुभव प्रमाणपत्रामध्ये उपरोक्त 'ब' व 'क' मधील कर्तव्ये व जबाबदा-या याचे स्वरूप असलेला अनुभव नमूद केला असणे आवश्यक आहे. आणि अन्य तज्ञ डॉक्टर पदाकरिता मुलाखतीचे वेळी उमेदवारांना सादर करवयाचे अनुभव प्रमाणपत्रामध्ये त्या त्या पदासमोरील उपरोक्त 'अ' व 'ब' मधील कर्तव्य व जबाबदाऱ्यांचे स्वरूप असलेला अनुभव नमूद करणे आवश्यक आहे.

३) मिनिस्टरी ऑफ सोशल जस्टीस अॅन्ड इम्प्वॉरमेन्ट यांचेकडील दि.१८/०१/२००७ चे नोटिफिकेशन नुसार OA आणि OL या प्रवर्गातील विकलांग असलेले उमेदवार आरोग्य अधिकारी व मेडिकल अॅडमीनीस्ट्रेटीव्ह ऑफीसर या पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. तथापी विकलांग वर्गवारीसाठी पद आरक्षित नाही.

i. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/२०११ /१३, दिनांक २३/८/२०११ मधील आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वायत संस्था इत्यादीच्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर पदव्यांना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभाग (शिक्षण विभाग) मंत्रालयाकडून केंद्र शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी वेळोवेळी प्रदान केलेली व भविष्यात प्रदान केली जाणारी समकक्षता राज्य शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

ii. स्वायत्त संस्थाचे कोर्स हे भारतातील विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या कोर्सशी समकक्ष असणे आवश्यक आहे.

iii. सर्व व्यवसायिक अभ्यासक्रमांना संबंधित केंद्रीय मान्यता मंडळाची (AICTE, MCI, PCI, BCI, NCTE, etc) त्या त्या संस्थेत / महाविद्यालयात / विद्यापीठात अभ्यासक्रम चालविण्याची मान्यता असणे आवश्यक आहे.

iv. संशोधनाच्या पदव्यांना त्या त्या विद्यापीठात / अभिमत विद्यापीठात / स्वायत्त संस्थेत असे संशोधन अभ्यासक्रम चालविण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता असणे आवश्यक आहे.

v. संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असल्यासच महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या अर्हता स्वीकाराह असतील.

vi. मान्यताप्राप्त विद्यापिठाबाबत उमेदवाराने धारण केलेली शैक्षणिक पात्रता ही केंद्रशासन व राज्यशासन यांचेकडील तदनुषंगिक आदेश, निर्णयाप्रमाणे असणे आवश्यक आहे.

**१. कर्तव्ये व जबाबदा-या :**

**आरोग्य अधिकारी** - पुणे महानगरपालिकेच्या अधिनियम कलम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४६ अन्वये 'आरोग्य अधिकारी' या पदावरील अधिकाऱ्यास या अधिनियमान्वये तद्नुसार जी कर्तव्ये पार पाडण्याचा त्यांना निदेश देण्यात आला असेल, ती कर्तव्ये आणि जी कर्तव्ये पार पाडण्याचे त्यांना आयुक्तांकडून फर्मावण्यात येईल, अशी अन्य कर्तव्ये पार पाडावी लागतील.

**अॅडमीनीस्ट्रेटीव्ह ऑफीसर व अन्य तज्ञ डॉक्टर** - अॅडमीनीस्ट्रेटीव्ह ऑफीसर व अन्य तज्ञ डॉक्टर यांना त्यांच्या पदाप्रमाणे 'आरोग्य अधिकारी' यांनी नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

**२. वयोमर्यादा :**

२.१ शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/ प्र.क्र.४०४/कार्या १२, दि.२५/०४/२०१६ नुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

२.२ शासन निर्णय क्र. एसआरव्ही- १०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ, दि.१६/०६/२००१ नुसार अपंग उमेदवारांची

कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील.

२.३ माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्र क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६अ, दि.२०/०८/२०१० प्रमाणे वयाची कमाल मर्यादा ४५ वर्षेपर्यंत राहील.

२.४ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुद्धिपत्रक क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०/०८/२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच,

२.५ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुद्धिपत्रक क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.०६/१०/२०१० अन्वये स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्यांसाठीचे वय ४५ वर्षे इतके राहील. तसेच,

२.६ पुणे महानगरपालिकेत विहित प्रक्रियेद्वारे व शासन मान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा लागू नसेल.

२.७ उपरोक्त नमूद वयोमर्यादा अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास विचारात घेतली जाईल.

२.८ शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्र.म.वै.व.-२०११/प्र.क्र.७४५/११/सेवा-३, दिनांक ३ ऑक्टोबर २०१३ या मधील नमूद विशेषज्ञ शाखेतील असाधारण किंवा अतिविशेषज्ञ शैक्षणिक अर्हताधारण केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त १० वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

३. **निवड पध्दत:**

३.१ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून केवळ किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलविण्याकरिता पात्र असणार नाही.

३.२ जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/ अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता /अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

३.३ चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, ऑनलाईन परीक्षेचा दिनांक ई-मेल /एस.एम.एस. (SMS) द्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल.

३.४ चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/ अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही.

३.५ चाळणी परीक्षा झाल्यास त्या परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरीत्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

३.६ ऑनलाईन परिक्षा झाल्यानंतर त्यादिवशी उत्तरतालिका (Answer Key) महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. त्याबाबत उमेदवारांची हरकत असल्यास त्यांनी ३ दिवसांत dmcgeneral@punecorporation.org या ईमेल वर पाठवाव्यात. उमेदवारांकडून समक्ष हरकती स्वीकारल्या जाणार नाहीत. तसेच ईमेल व्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. त्या अनुषंगाने घेण्यात येणारे निर्णय अंतिम राहतील.

३.७ पुणे म.न.पा. प्रशासनाकडून गुणांची सीमारेषा (Cut of Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा निश्चित करताना मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित राखण्याच्या, तसेच किमान गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने गुणांची किमान टक्केवारी राखण्यात येईल व सदर टक्केवारी प्रकरणपरत्वे पुणे म.न.पा. प्रशासनाकडून निश्चित करण्यात येईल.

३.८ गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणाच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

३.९ ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३.१० संबंधित परीक्षेच्या गुणांची सीमारेषा (Cut of Line) निकालानंतर पुणे मनपाच्या संकेतस्थळ यावर प्रसिद्ध करण्यात येईल.

३.११ गुणांच्या सीमारेषेसंदर्भात प्राप्त होणा-या कोणत्याही अभिवेद्नाचा विचार केला जाणार नाही.

३.१२ सरळसेवा भरती करिता घेण्यात येणारी चाळणी परीक्षा हि मुलाखतीकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची /उत्तरपुस्तीकांची गुणपडताळणी अथवा फेर तपासणी केली जाणार नाही. अथवा या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेद्नावर कार्यवाही केली जात नाही .

३.१३ उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे. ते आजमावणे हा मुलाखतीचा उद्देश असतो. मुलाखतीच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नाबरोबरच ज्यासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल.

३.१४ ऑनलाईन परीक्षेच्या निकालानंतर, पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. तसेच ई-मेलवर अथवा मोबाईलवर मेसेजद्वारे कळविणेत येईल.

३.१५ कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, बॅक चलन इ. बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याची प्रत्येकी एक साक्षांकित प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे

तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करणेत येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**३.१६** कागदपत्रे तपासणीनंतर /मुलाखतीनंतर निवडयादी व अतिरिक्त निवडयादी पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org व महा ऑनलाईन प्रा. लि. या https://maharecruitment.mahaonline.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**३.१७** प्रमाणपत्र तपासणीकरीता येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची स्वस्वाक्षांकित (Self Atttested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**३.१८** चाळणी परीक्षा न झाल्यास, मुलाखत १०० गुणांची असेल.

**३.१९** निश्चित केलेल्या निकषाच्या आधारे अथवा चाळणी परीक्षेसाठी विहित केलेल्या सीमारेषेच्या आधारे अर्जात दिलेल्या माहितीनुसार मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना ते विहित अटीची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**३.२०** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर SMS द्वारे कळविण्यात येईल.

**३.२१** मुलाखत पत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. मुलाखतपत्र महानगरपालिकेच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरुन स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डद्वारे स्वत:चे खर्चाने उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

**४ समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी :**

**४.१** अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास धारण केलेली संबंधित विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता व त्यामध्ये विद्यावाचस्पती (डॉक्टरेट) पारंपारिक विद्यापीठाची संशोधन पदव्युत्तर पदवी (एम.फील), दूरस्थ शिक्षणाद्वारे संशोधन पदव्युत्तर पदवी (एम.फील) पारंपारिक विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी, दूरस्थ शिक्षणाद्वारे पदव्युत्तर पदवी या उतरत्या क्रमाने.

**४.२** संबंधित विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक.

**४.३** सेवाप्रवेश नियम / जाहिरात / अधिसुचनेमध्ये प्राधान्यशील अर्हता विहित केली असल्यास, ती अर्हता.

**४.४** वय - वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.

**४.५** वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.

**४.६** सेवाप्रवेश नियम /जाहिरात /अधिसुचनेमध्ये अनुभव विहित केला असल्यास, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी.

**५ . अर्ज, अर्हता, परिक्षा शुल्क इत्यादि :**

५.१ ऑनलाईन पध्दतीशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज स्वीकारण्यासाठी विहीत केलेला दिनांक व वेळेनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

५.२ महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्वीकारण्यासाठी विहीत केलेला अंतिम दिनांक इत्यादी तपशील आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास, अर्ज स्वीकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत तसे मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना परस्पर कळविणेची विनंती आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना करावी. अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास मा. महापालिका आयुक्त, पुणे यांना तसे कळविण्याची आवश्यकता नाही, हेही त्यांना कळवावे.

५.३ परिक्षा शुल्क : रु ८००/-

५.४ माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.

५.५ परीक्षा शुल्क भरल्याबाबतची बँक चलनाची प्रत कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**६. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :**

६.१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.punecorporation.org व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील .

६.२ पात्र उमेदवाराला वेब बेस (Web-based) ऑनलाईन अर्ज दिनांक २१/०८/२०१७ ते दिनांक ११/०९/२०१७ या कालावधीतच http://maharecuitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

६.३ अर्जात हेतूपरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

६.४ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येईल.

६.५ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

६.६ गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

**६.७ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

१. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.

२. अर्ज सादरीकरण

३. शुल्क भरणा

६.८ प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.

१. https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नवीन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नांव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२. प्रोफाईलव्दारे माहिती भरताना उमेदवाराने स्वत:चाच ई मेल आयडी, मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

३. उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रकियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे.

४. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वत:च्या Login व Password व्दारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

५. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलव्दारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र /फोटो (रुंदी ३.५ से.मी.x उंची ४.५ से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी :

१) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.

२) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.




३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.

४) विहित आकार/ क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.

५) उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.

६) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

७) फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेज स्कॅन करुन jpg फॉर्मेट मध्ये संगणकावर वेगवेगळ्या फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. फोटो, तसेच स्वाक्षरी इमेज प्रत्येकी ५० Kb पेक्षा जास्त असता कामा नये. यापेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्वीकारली जात नाही. इमेजची साईज ५० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no. of colours, etc. व्दारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

८) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## ६.९ अर्ज सादरीकरण :

१. https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डव्दारे यशस्वीरित्या प्रवेश (Login) केल्यानंतर "ऑनलाईन अर्ज" येथे क्लिक करावे. जाहिरातीव्दारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

२. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या जाहिरातीच्या उजवीकडे असलेल्या "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या ठिकाणी क्लिक करावे.

३. उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल. वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.

४. जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहित होऊ शकत नाही असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरित्या जतन झाला असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.

५. रक्कम भरा या पर्यायावर क्लिक करुन अर्जदाराला क्रेडीट कार्ड /डेबीट कार्ड / नेट बँकिंग (35+ बँका) व्दारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करुन भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे, संग्राम केंद्र/ सीएससी (नागरिक सेवा केंद्र) येथे चलनाव्दारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्वीकारु शकेल.

६. https://maharecruitment.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

७. विहित पद्धतीने अर्ज सदर करून ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच भारतीय स्टेट बँकेत शुल्क भरण्याकरता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ११/०९/२०१७ रोजी २३:५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

८. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १३/०९/२०१७ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

### ६.१० शुल्क भरणा

यशस्वीरित्या अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा

१. शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

२. "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या /न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहीलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल.

३. "Pay Now" या लिंक वर क्लिक केल्यांनतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट, (ब) नागरी सुविधा केंद्र, (क) चलनाव्दारे.

४. क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बँकींगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करता येईल.

५. नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

६. ज्या उमेदवारांना इंटरनेट व्दारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल, असे उमेदवार महा ई-सेवा केन्द्रा मार्फत आपला अर्ज करु शकतात. त्याच वेळी उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व सेवा केंद्राचे शुल्क घेतले जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती महा ई सेवा केंद्रा तर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो /स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाकडून आकारली जाईल.

७. चलनाव्दारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

८. भारतीय स्टेट बँकेमध्ये चलना व्दारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बॅकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

९. चलनाव्दारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाव्दारे शुल्क भरताना परिक्षा शुल्क + बॅकेचे सेवा शुल्क भरावे लागतील.

**६.११ सर्वसाधारण सूचना**

१. प्राप्त अर्जाच्या संख्येचा विचार करून निवड प्रक्रियेचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार निवड समितीला राहील.

२. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतःच करणे आवश्यक आहे.

३. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती CAPITAL LETTERS मध्ये भरावी. संक्षिप्तपणे(Abbrevations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नांव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

४. महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

५. एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नांव बदलले असल्यास अथवा प्रमाणापत्रातील नावांत कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

६. पत्रव्यवहाराचा स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यवसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

७. अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्याने / मिळाल्याने उमेदवारी रद्द होवू शकते.

८. संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात / अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

९. एकाहून अधिक सेवेच्या / पदाच्या अथवा इतर परीक्षा अथवा मुलाखती एकाच दिवशी असल्यास याबाबत विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. परीक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही. तसेच, भरलेल्या शुल्काचा परतावा देखील करता येणार नाही.

**६.१२** वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

६.१३ उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करू इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास पुणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

६.१४ उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर/ उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

६.१५ पूर्णत: माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाची प्रिंट परीक्षेच्या वेळी तसेच कागदपत्रे तपासणीचे वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

६.१६ अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस कागदपत्रांच्या छाननीशिवाय ऑनलाईन परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार ऑन लाईन परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ ऑनलाईन परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

६.१७ भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ www.punecorporation.org व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, या व्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाव्दारे भरती प्रक्रीयेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६.१८ विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्वीकृत केला जाणार नाही.

६.१९ ऑनलाईन प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार असल्यास **०२२ - ६१३१६४०३** या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.०० ते रात्री ८.०० ; शनिवार व रविवार सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत संपर्क साधावा. **किंवा** अर्ज भरण्यासंबंधी, प्रवेशपत्र उपलब्ध होणेसाठी उमेदवारांनी support@mahaonline.gov.in **यावर ई मेल पाठवल्यानंतर उमेदवारांना त्यांच्या अडचणीचे निराकरण करुन उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर संदेश किंवा ई मेल आयडीवर पाठविण्यात येईल**. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई मेल इत्यादी अचूकपणे भरणे अनिवार्य आहे.

६.२० उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील, तसेच ई-मेल आयडी व

भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना पुणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. प्रवेशपत्र डाउनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस.द्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींसोबत देवाण-घेवाण करू नये. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

**७. ऑनलाईन परीक्षा :**

**७.१** 'आरोग्य अधिकारी' व 'अन्य तज्ञ डॉक्टर' पदासाठी ऑनलाईन परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास ती खालील प्रमाणे राहील.

१. परिक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुध्दीमत्ता चाचणी या विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर अभ्यासक्रम पदवी दर्जासमान राहील. प्रश्न वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचे असतील.

२. आरोग्य विषयाशी संबंधित तांत्रिक प्रश्न पदवी/ पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या दर्जासमान राहील. प्रश्न वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचे असतील.

३. उपरोक्त ९० गुणांच्या ऑनलाईन पध्दतीने होणा-या परीक्षेसाठी एकत्रितपणे ९० मिनिटांचा कालावधी अनुज्ञेय राहील.

४. ऑनलाईन परीक्षा ही आरोग्य अधिकारी पदाची शैक्षणिक अर्हता, कामाचे स्वरुप, भाषा, सामान्यज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी, तांत्रिक ज्ञान यांचेशी संबंधित राहील.

| अ.क्र. | चाचणी | प्रश्नांची संख्या | गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक क्षमता | १० | २० | ९० मिनिटे |
| २ | पदाशी संबंधित तांत्रिक ज्ञान | ३५ | ७० | |
| | एकुण | ४५ | ९० | |

प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील.

**७.२** जाहिरातीत नमूद पदांकरिता अर्ज केलेल्या ऑनलाईन परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र www.punecorporation.org व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन परीक्षेच्या किमान ८ (आठ) दिवस अगोदर त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. (अपलोड करण्यात येतील) उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षा प्रवेशपत्र स्वतः संकेतस्थळावरुन काढुन घ्यावे.

**७.३** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे बंधनकारक आहे, त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वतःजवळ जपून ठेवावे.

७.४ अपंग कल्याण आयुक्तालय यांचे दि. २० डिसेंबर २००६ चे परिपत्रकानुसार तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क्र.२,दिनांक १८/३/१४ अन्वये शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार दृष्टीहीन,अल्पदृष्टी,सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबी संदर्भात व्यवस्था करण्यात येईल. नि:समर्थ (अपंग) असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्या वेळी सहाय्यक व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करणेत येईल. त्याकरिता परीक्षेचे वेळी सहाय्यक उपलब्ध करुन

देण्याबाबत उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेच्या १५ दिवस अगोदर उप आयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे महानगरपालिका यांचेकडे अपंगत्वाच्या प्रमाणपत्रासह सुस्पष्ट लेखी मागणी करणे आवश्यक आहे. अशी सहाय्यकाची मागणी न केल्यास ऐनवेळी सहाय्यकाची मदत घेता येणार नाही व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार चालणार नाही.

७.५ ज्या उमेदवारांना परीक्षेच्या दिवशी सहाय्यकाची मदत पुरविण्यात आली आहे, अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल. तथापि अशा उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेच्या वेळी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

७.६ काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परिक्षेच्या तारखांमध्ये / परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती www.punecorporation.org व https://maharecruitment.mahaonline.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७.७ **ओळख पटवणे**

i) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / आधार कार्ड/ फोटोसहीतचे पासबुक / कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहीत असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक/ पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

**टिप:-** उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहतांना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नांव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावांत विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी